ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಗುಣಮಟ್ಟ ಮೌಲ್ಯಾಂಕನ
# ಮತ್ತು
# ಅಂಗೀಕರಣ ಪರಿಷತ್ತು

**6 ನೇ ಅಡ್ಡ ರಸ್ತೆ– ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ**
**ಬೆಂಗಳೂರು 560 003**

## ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
## ಕಲಿಕಾ ಮಾನಕಗಳು

**1 ರಿಂದ 10 ನೆತ್ತೆ**

# कर्नाटक शाळा गुणवत्ता मुल्यांकन
# आणि
# मानांकन परिषद

6वा आडवा रस्ता - मल्लेश्वरम्
बेंगळूरू 560 003

## प्रथम भाषा : मराठी
## अध्ययन मानांकन

इयत्ता : 1 ली ते 10 वी.

कर्नाटक सरकार

# कर्नाटक शाळा गुणवत्ता मुल्यांकन आणि मानांकन परिषद

मल्लेश्वरम् - बेंगळूरू

# प्रथमभाषा मराठी : अध्ययन मानांकन

**- मानक साहित्य रचना समिती -**

## मुख्य संपादक

**श्री. माधव कुंटे,** शिक्षक, श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल, बेळगाव-590 001

## सह संपादक

- **श्री. सुनील मुकुंदराव कुलकर्णी,**
  शिक्षक, आर. डी. हायस्कूल, चिक्कोडी, जि. बेळगाव
- **श्रीमती पद्मा नेगनाळकर,**
  मुख्याध्यापिका, सरकारी मराठी उच्च प्राथमिक शाळा, गोंधळी गल्ली - बेळगाव
- **श्री. पी.के. मुचंडीकर,**
  समूह संपन्नमूल व्यक्ती, बेळगुंदी, ता. बेळगाव.
- **श्री. सी.वाय. पाटील,**
  शिक्षक, ठळकवाडी हायस्कूल, टिळकवाडी, बेळगाव
- **श्रीमती शैला विनोद मत्तीकोप,**
  शिक्षिका, महिला विद्यालय हायस्कूल, कॉलेजरोड, बेळगाव
- **श्री. पी.एल. भातकांडे,**

## संयोजक

**श्री. टी.के. राघवेंद्र**

योजना संयोजन अधिकारी, कर्नाटक शाळा गुणवत्ता मुल्यांकन आणि मानांकन परिषद, बेंगळूरू

# 'मराठी भाषेचा इतिहास आणि मराठी भाषेची वैशिष्ट्ये'

मराठी एक समृद्ध भाषा आहे. संस्कृत ही मराठीची जननी आहे. मराठीची लिपी 'देवनागरी' लिपी आहे.

मराठी भाषेतील पहिला शिलालेख आपल्या कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील श्री गोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. 'श्री चावुण्डराये करवियले' ही शिलालेखातील ओळ म्हणजे मराठी भाषेतील उपलब्ध असणारे पहिले वाक्य आहे. सुमारे अकराशे वर्षांचा इतिहास या भाषेला आहे.

संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', आद्यकवी श्री. मुकुंदांचा 'विवेकसिंधू' म्हाइंमभटाचे आद्य गद्य 'लीळाचरित्र' या सर्वांचा काळ आठशे ते हजार वर्षांपूर्वीचा आहे.

कन्नड भाषेमध्ये दास संप्रदायाने 'दासरपद्य' च्या रूपाने जशी साहित्यात मोलाची भर घातली, त्या प्रमाणे मराठी साहित्यात संत वाङ्मयाची फार मोठी भर पडलेली दिसून येते. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, चोखामेळा, गोराकुंभार, सावंतामाळी यांच्या बरोबरीने मुक्ताई, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई अशा महिलाही संत कवयित्री म्हणून प्रसिद्ध झाल्या. समर्थ रामदासांच्या दासबोधाने मनास बोध केला. आणि तुकारामांच्या गाथेने त्यावर कळस चढविला.

'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ॥'

रघुनाथ पंडित आणि वामन पंडित यांच्या पंडिती काव्यानी मराठी भाषेला वैभव प्राप्त करून दिले. छत्रपतींच्या राज्यात शाहिरांनी पोवाडे गाऊन समस्त मराठी माणसात वीर रसाचा संचार करविला. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुंतल पासून ते आचार्य अत्रे यांच्या संत गोरा कुंभार या अगदी अलिकडील नाटकाने संगीत आणि नाटक या दोन्ही क्षेत्रात मराठी रंगभूमीला उंच शिखरावर नेऊन ठेवले. मराठी नाट्यसृष्टिने 'नाट्यगीत' या नावाचा एक नवीन प्रकार पद्य साहित्याबरोबरच संगीत क्षेत्रालाही दिला. दादासाहेब फाळके पुरस्काराने आज सिनेमाच्या चंदेरी दुनियेतील दिग्गजांना गौरविले जाते त्या दादासाहेबांनी काढलेला पहिला भारतीय चित्रपट म्हणजे 'राजा हरिश्चंद्र'.

भा.रा. तांबे, बालकवी, केशवसुत आदिं पासून मंगेश पाडगावकर ते संदीप खरे सारख्या तरुण कविंनी मराठी कवितेला समृद्ध कले. आधुनिक वाल्मिकी ग.दि. मांडगुळकरांचे गीत रामायण घराघरात पोचले. दलित साहित्यानेही आपले वेगळेपण सिद्ध केले.

वि.स. खांडेकर (ययाती), वि.वा. शिरवाडकर 'कुसुमाग्रज' (समग्र मराठी साहित्य सेवा). विंदा करंदीकर (अष्टदर्शने) या थोर लेखकांनी मराठीला मानाचे 'ज्ञानपीठ' प्राप्त करून दिले.

# ‘मराठीची वैशिष्ट्ये’

आपल्या भारतात शिक्षण क्षेत्रात एक समान भाषाभ्यासाचे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे. या धोरणानुसार विद्यार्थी आपली मातृभाषा, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा अशा तीन भाषा शिकतो. त्रिभाषा शिक्षण सूत्राप्रमाणे मातृभाषेच्या अभ्यासाला प्रथम भाषेचा दर्जा देण्यात आला आहे.

मराठीचा प्रथम भाषा म्हणून अभ्यास करत असताना अध्ययन आणि अध्यापन करणाऱ्या दोन्ही समुदायाने मराठी भाषेची काही ठळक वैशिष्ट्ये समजून घेणे गरजेचे आहे.

- मराठी भाषेची लिपी देवनागरी आहे. या लिपीत उभ्या रेघा, आडव्या रेघा, अर्धवर्तुळाकार आकार, विराम चिन्हे, इत्यादी प्रकारच्या सांकेतिक खुणांच्या सहाय्याने अक्षरे बनतात.

- मराठीला बाराखडी आहे. या बाराखडीत ऱ्हस्व, दीर्घ उच्चाराचे क,ख.... पासून ह,ळ,क्ष,ज्ञ पर्यंतचे सर्व वर्ण बसविले आहेत. मराठी लेखन करताना प्रत्येक शब्दावर शिरोरेघ दिली जाते.

- ‘च’, ‘ज’ आणि ‘झ’ या वर्णांचा उच्चार बोलताना - लोक रूढीने अनुक्रमे च (च्य), ज (ज्य) आणि झ (झ्य), असा होतो. या अक्षरांचा जसा आहे तसा उच्चार ज्यात होतो. ते शब्द उदाहरणा दाखल पाहू - च=चमचा, च=चला सारे गाऊ, च=च्यप्पल (हे केवळ बोलताना), च=च्यहा. तसेच ज=जगणे, पण बोलताना ज=ज्यग (दुनिया या अर्थी) अर्थात बऱ्याच भारतीय भाषामध्ये लिहिणे वेगळे आणि उच्चार करणे वेगळे असे दाखले दिसून येतात.

- लिंग विचार मराठीत विस्तृत आहे. स्त्री-पुरुष प्रत्यक्ष जन समुदायाला तर आहेच. उदा. मुलगी गाते तर मुलगा गातो. हाच नियम मराठीत प्राणीजगतालाही लागू आहे उदा. गाय चरते तर बैल चरतो. मराठीचे वैशिष्ट्य असे की आपल्या परिसरातील निर्जिव वस्तुमध्येही मानवीरूप पाहून मराठीने निर्जिव वस्तुंनाही लिंग विचारात बांधले आहे. विशेषतः कोमल आणि ‘इ’ कारान्त नामे स्त्रिलिंगी तर ‘आ’ कारान्त व आकाराने मोठ्या वस्तु पुल्लिंगी मानल्या जातात. एक गमतीशीर उदा. पाहू - जुन्या घरातून लाकडाच्या मोठ्या तुळ्या आडव्या घालून छपराला आधार देत, तुळईच्या आकाराचेच उभे खांब ही असत. आता पहा वस्तू एकच पण आडवी घातली की तुळई (स्त्री.) आणि उभी केली की खांब (पु.). डबा-पुल्लिंगी तर डबी (स्त्री.) येथे आकार पाहिला जातो. आंबा (पुल्लिंगी) तर चिंच (स्त्री.), मराठीत हाच नियम नपुसक लिंगासाठी आहे. मूल (न.लिं), पिल्लू (न.), फळ (न.) शेवटी एक गंमत पहा - तो चहा, ती कॉफी आणि ते दूध!

# मराठी संस्कृती

**'Mother tongue leads to social and cultural- integration.'**

मातृभाषा हे केवळ सामाजिक ऐक्याचेच नव्हे तर सांस्कृतिक ऐक्याचे देखिल साधन आहे. प्रत्येक भाषा बोलणाऱ्यांचा एक समुदाय बनतो. त्या समुदायाची एक संस्कृती बनते. ही संस्कृती साहित्यातून, लोक संवादातून अभिव्यक्त होत असते. भाषेला संस्कृतिचा आरसा म्हणतात ते या साठीच-

'Language is the mirror of the Culture.'

संस्कृती म्हटले की लोकांची राहणी, खाण्यापिण्याच्या सवयी, वेषभूषा, आचार-विचार, सणवार या सांस्कृतिक घटकांकडे आपण पाहतो. पण या संस्कृती आचरणातून मुलांचा बौद्धिक विकासही न कळत होत असतो. सांस्कृतिक कार्याच्या माध्यमातून मुलांचा शब्द संग्रह, निरीक्षण शक्ती आणि उपयोजन शक्ती वाढते. मुलांच्या जीवनात डोकावून पहा.  परिक्षेच्या दृष्टिने मुले तयारी करतात, ती एका दडपणाखाली तर एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुले सहभागी होतात ती उत्स्फूर्त! कोणी नाटकात भूमिका करून आपले भाषण कौशल्य दाखवितो, तर कोणी लेखन स्पर्धेत भाग घेऊन आपले लेखन, अभिव्यक्ती, स्मरण, सुंदरतेचा पुरस्कार अशा कितीतरी जीवनमूल्यांचा दाखला देतो. कोणी त्या आनंदी घटनेचे केवळ साक्षिदार या नात्याने त्यातील उत्तमाचे निरीक्षण करतात, उत्तमाचे श्रवण करतात आणि आपली ग्रहणशक्ती वाढवून आपल्या परिने त्याचा उपयोग करतात.

पंढरीची वारी ही मराठी जीवनाची संस्कृती आहे. त्या संस्कृतितूनच संतवाङ्मय जगात सर्वदूर पोचले. समर्थ रामदास, डॉ. आत्माराम पांडुरंग, भारतरत्न अण्णा साहेब कर्वे, महात्मा फुले, बाबा आमटे यांच्या पर्यंतच्या अनेकांनी मराठी भाषेत लिहून एक सामाजिक संस्कृती निर्माण केली.

बॅ. गोपाळकृष्ण गोखले, भारत भूषण लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे, यांनी मराठीला राजकीय सांस्कृतिक स्थान मिळवून दिले.

समर्थ रामदासांपासून ते थेट डॉ. जयंत नारळीकर, डॉ. वसंतराव गोवारीकरांपर्यंत अनेकांनी मराठीभाषेतून वैज्ञानिक आणि शैक्षणिक संस्कृतिची जोपासना केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने जो उत्स्फूर्त पराक्रम गाजवून, शिस्तबद्ध, योजनाबद्ध सैन्याची जी संस्कृती दिली त्याचे स्मरण ठेवून भारत सरकारच्या संरक्षण विभागाने प्रत्यक्ष आघाडीवर जाऊन लढणाऱ्या एका बटालियनचे नाव 'मराठा लाईट इन्फंट्री' असे ठेवले आहे, हे विसरता येणार नाही.

भाषा आणि संस्कृतीचा हा धावता आढावा आपण घेत आहोत. भाषा आणि संस्कृती एकमेकाशी कसे घट्ट बांधले गेले आहेत, या बद्दल अध्ययन आणि अध्यापनाच्या दृष्टिने आता आपण विचार करू - उदाहरणा दाखल एक छोटेसे बालगीत पुढे देत आहे ते पहा -

आंब्याचा आमरस। काकडीचा कायरस

दह्याचं श्रीखंड। केळ्याची शिकरण

डाळीचं पुरण। भातावर वरण

चला चला सारे। जेवूया सर्वजण

या चार ओळीत जे जे शब्द आलेले आहेत ते सर्व खास मराठी संस्कृतीशी जोडले गेले आहेत. अशा छोट्या कवितेतून मुलांना केवढा जीवनानुभव मिळतो, किती सहजगत्या शब्द संग्रह वाढतो.... डोळ्या समोर केळीच्या हिरव्या पानात वाढलेले पदार्थ येतात... कल्पनेतूनच सौंदर्यानुभूती मिळते.

दिवाळी आणि गणेशोत्सव हे मराठी संस्कृतीचे खास सण. गणेशोत्सवाला लोकमान्य टिळकांनी धार्मिकतेकडून राजकीय आणि सामाजिक आधिष्ठान मिळवून दिले. या उत्सवांचे सामाजिक उच्च स्थान आदर्श गणेशोत्सव मंडळांनी आजही जपले आहे.

'महाराज! आधी लगीन कोंडाण्याचं, मग रायबाचं' हे वीर, उत्स्फुर्त ऐतिहासिक वाक्य आजही आपण अग्रक्रमाने येणाऱ्या मोहिमेसाठी वापरतो. First preference to difficult work अशा अर्थी हे वाक्य एक लोकोक्तीच होऊन गेले आहे.

कर्नाटकात प्रसिद्ध असलेले पक्वान्न 'मंडिगे' हे मांडे या नावाने मूळचे मराठी संस्कृतीतले आहे. या मांड्यावरून किती वाक्प्रचार आहेत - 1) मनातले मांडे खाणे (कल्पनेतच सूख मानणे) 2) कोंड्याचा मांडा करणे (असेल त्या परिस्थितीत समाधान मानणे).

'वाळा' हे हातात घालायच्या दागिन्याचे अस्सल मराठी नाव. 'मोत्याची नथ' हे अस्सल मराठी आभूषण. फुकटचा डामडौल दाखविणाऱ्या महिले बद्दल म्हटले जाते - 'नाव सोनूबाई हाती कथिलाचा वाळा.' तर वरिष्ठांपेक्षा कनिष्ठ जेव्हा डोईजड होऊ लागतो तेव्हा म्हणतात - 'नाका पेक्षा मोती जड!'

'शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा!' शिरपेच म्हणजेच मानाचा फेटा किंवा पगडी. साहित्यिक अर्थ असा की आधीच भरपूर मान सम्मान मिळविलेला मनुष्य उदा. सचीन तेंडूलकर - 'सचीनच्या महाशतकाने त्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा!'

हे सर्व रीती रिवाज मराठी संस्कृतीशी निगडित आहेत, मराठी संस्कृतीबरोबर मराठी भाषा वैभव वाढविणारे मराठीचे हे सांस्कृतिक दागिनेच आहेत.

◆◆◆

# मातृभाषा मराठी

## -: अध्ययन आणि अध्यापनाची उद्दिष्ट्येः-

प्रत्येक मूल मातृभाषा घरीच शिकते. मातृभाषा समजणे आणि बोलणे या किय्रा बालपणापासून आत्मसात केल्या जातात. म्हणून तर त्या भाषेला **मातृभाषा** म्हणतात.

श्री. श्रीकृष्ण स्वामी या भाषा तज्ज्ञांच्या मते - 'भाषा शिकणे हा एक कौशल्याचा प्रकार आहे. वयोमानानुसार, अनुभवानुसार या कौशल्यांचा अधिकाधिक विकास होऊ लागतो, 'An Introduction to linguistics for Language teachers' या आपल्या पुस्तकात श्री. स्वामी म्हणतात - 'भाषा अध्ययन ही प्रक्रिया यांत्रिक नसून ती नव निर्मितीची प्रक्रिया आहे. भाषा शिकणे म्हणजे सृजनशील क्रिया करणे होय.

भाषेच्या अध्ययनात चार मूलभूत घटकांचा समावेश होतो. 1) बोललेली भाषा समजणे - श्रवण. 2) भाषा बोलणे - भाषण 3) वाचन आणि 4) लेखन.

श्रवण आणि भाषण ही मूलभूत व प्राथमिक कौशल्ये आहेत. भाषा शिकण्याची शक्ती आणि प्रवृत्ती माणसात जन्मतःच असते. त्या शक्तीच्या जोरावरच मूल आपल्या घरातच श्रवण आणि भाषण कौशल्ये आत्मसात करतात. बऱ्याच वेळा आपल्या सर्वांच्या निरीक्षणात असे दृष्य आले असेल की -

### पूर्व प्राथमिक शाळा -

**शिक्षिका** :- अमोल वर्गात काही बोलतच नाही. तुम्ही घरी जरा त्याच्याशी अगदी फ्रेंडली बोलत चला. घरी त्याच्यावर काही दडपण आहे का?

**अमोलची मम्मी** :- बोलत नाही! घरी येऊन पहा टिचर. घरात खूप दंगा करतो. मोठ मोठ्याने ओरडतो. भावंडांशी भांडतो, घरी मोठ्यांना उलट उत्तरे ही देतो.

हे असे का होते? बोलणे म्हणजे भाषण आणि त्या आधीचे श्रवण या क्रिया मुलांच्या घरीच तयार होत असतात. वातावरणात बदल झाल्यामुळे ते मूल एकीकडे ही कौशल्ये प्रकट करते तर दुसरीकडे नाही. असंस्कारित आणि सुसंस्कारित अशी परिसर भिन्नता झाल्यामुळे असे होत असावे असे वाटते. म्हणून नेमके हेच काम शाळेने करावयाचे आहे. 'नैसर्गिकरित्या प्राप्त झालेल्या कौशल्यांना सुसंस्कारित कसे करता येईल? याचे नियोजन शाळेने करावयाचे असते. श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या चारही कौशल्यांवर उत्तम संस्कार करून संस्कारित नागरिक तयार करणे हे मातृभाषा शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या अध्ययन आणि अध्यापनाच्या उद्दिष्टांकरीता आपण पुढील तक्ता पाहू-

# मातृभाषा मराठी : अध्ययन / अध्यापनाची उद्दिष्टे




वरील तक्त्यानुसार विश्लेषण करायचे म्हटले तर थोडक्यात असे सांगता येईल की - 1) ग्रहणात्मक उद्दिष्टांचा अर्थ विद्यार्थ्यांच्या भाषा ग्रहण शक्तीचा विकास करणे हा आहे. विपुल शब्द, त्या शब्दांचे अर्थ, अर्थ छटा, संदर्भानुसार बदलणारे अर्थ, वाक्‌प्रचार, म्हणी, सुभाषिते व पत्रे, व्यावहारिक जीवनात उपयोगी असे पत्र लेखन, सन्देश लेखन इ. सर्व भाषा घटकांचे उत्तम श्रवण विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावे.

वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी भाषेचा पूर्ण रसास्वाद घ्यावा म्हणून अलंकार, रस, छंद, सौंदर्य, शैली या भाषेच्या सौंदर्य पैलूंचा आपण अभ्यास करवून घेऊ. या पैकी एखाद्या पैलूबद्दल जरी विद्यार्थी उत्स्फूर्त बोलू लागले तरी भाषा कौशल्याच्या चारही - मूलभूत क्रियाप्रत आपण येऊन पोचलो असे म्हणता येईल.

रसग्रहण आणि सृजन - या वाङ्मयीन उद्दिष्टांच्या पूर्ती करीता वाङ्मयाचा आस्वाद घेण्याची उच्च क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण करणे हे मातृभाषा शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सुंदर, स्वतंत्र, मौलिक आणि शैलीदार लिखाणाची क्षमता मुलांमध्ये येईल हा उद्देश समोर ठेवून मातृभाषेचे अध्यापन आणि अध्ययन होईल हे पाहणे गरजेचे आहे. सर्वच मुले लेखक, कवी होतील असे नाही. तथापी आपल्या अवती भवती आपल्या भाषेतील चांगले काय आहे, ते पाहण्याची, अवलोकन करण्याची, ऐकण्याची, साध्य तितके लिहिण्याची सवय लावणे हे मातृभाषा शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. हे सामर्थ्य ज्यांना प्राप्त होते ते विद्यार्थी भारता सारख्या बहूभाषी राष्ट्रात इतर भाषेतील वाङ्मयाचा आस्वाद घेण्यास प्रवृत्त होतात. इतर भाषांविषयी आस्था ही - वाङ्मयीन उद्दिष्टांची परिसीमा होय.

# शैक्षणिक मानकांचा उद्देश

**(Aims and objectives of Learning standards)**

१) शैक्षणिक मानक दर्जेदार अध्ययन, अध्यापनाची आणि विशिष्ट ध्येयाप्रत पोचण्याची हमी देतात.

२) रचनात्मक विकास आणि कृतीपूर्ण अध्ययन व अध्यापन हा शैक्षणिक मानकांचा पाया आहे.

३) निर्धारित शैक्षणिक मानक विद्यार्थ्यांना उच्च शैक्षणिक अनुभव देण्यास निश्चित सहाय्यभूत ठरतात. म्हणूनच उच्च शैक्षणिक विकासाची सर्व विद्यार्थ्यांकडून अपेक्षा करणे हे शैक्षणिक मानकांचे उद्दिष्ट आहे.

४) मानक निश्चितकरून अध्ययन प्रक्रियेत मुलांना आणल्यामुळे वर्गखोली शिक्षण पद्धतीमध्ये आश्वासक व सकारात्मक अध्यापनाचे वातावरण तयार होते.

५) मानक आधारित अभ्यासक्रम (Curriculum and syllabus) हा शैक्षणिक अनुभव देईल असा समृद्ध असतो, आणि तो तसा असावा.

६) जास्तीत जास्त अनुभव देण्याच्या प्रयत्नांचे प्रतिबिंब म्हणजे मानक आधारित अध्ययन, अध्यापन क्रीया होय.

७) मानक आधारित अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत उद्दिष्टाप्रत पोचण्याच्या अपेक्षा, करावयाच्या कृती, स्पष्ट अधोरेखित केल्या जातात.

विद्यार्थ्यांचा नेमका कोणता विकास साधावयाचा आहे, आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांस त्या विकासाप्रत नेण्यासाठी काय केले पाहिजे हे नेमकेपणाने स्पष्ट करणारे साधन म्हणजे शैक्षणिक मानक होत. म्हणूनच या मानकांना शिक्षणाचे मानदंड म्हटल्यास वावगे ठरणार नाही अशी अपेक्षा आहे. ‘मानक आधारित शिक्षण’ या नवविचाराचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक स्वागत करतील अशी आशा आहे.

‘शैक्षणिक मानक’ निर्धारित करत असताना तीन गट केले आहेत. इयत्ता पहिली ते पाचवी हा पहिला गट. तर दुसऱ्या गटात इयत्ता सहावी ते आठवीचा समावेश केलेला आहे. आणि तिसरा गट इयत्ता नववी ते दहावीचा आहे याची नोंद घ्यावी.

# प्रथम भाषा मराठी

## -: सर्व सामान्य उद्दिष्ट्ये :-

### (First Language Marathi - General Learning standards)

1. निर्दिष्ट कालावधीत माहितीचे लक्षपूर्वक श्रवण करता येणे व अर्थ समजून घेणे.
2. योग्य उच्चार, आशयानुरूप आवाजातील चढउतार, योग्य गती याची जाण ठेवून बोलता येणे.
3. आपले विचार, भावना, कल्पना, इच्छा व अनुभव स्पष्ट आणि समर्पक शब्दातून तोंडी व्यक्त करता येणे.
4. विविध प्रसंगात आत्मविश्वासपूर्वक बोलता येणे.
5. प्रभावी रीतीने प्रकट वाचन करता येणे.
6. आवश्यक त्या गतीने मूक वाचन करता येणे.
7. लेखनातून स्पष्ट व आकर्षक स्वरूपात आपले विचार व भावना व्यक्त करता येणे.
8. शब्द कोश पाहता येणे.
9. इतर विषयांच्या अध्ययनासाठी उपयुक्त अशी भाषिक, कौशल्ये विकसित होणे.
10. शब्द संग्रह उत्तरोत्तर समृद्ध होत जाणे.
11. प्रसंगानुरूप, व्यक्तीनुसार योग्य प्रकारे संवाद साधता येणे.
12. कल्पक, सृजनशील, अभिव्यक्तीची क्षमता वाढविणे.
13. ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या, गोष्टीबाबत निष्कर्ष काढता येणे व त्या बाबतचे विचार स्वतःच्या शब्दात मांडता येणे.
14. भाषेच्या व्यवस्थेची स्थूल स्वरूपात माहिती होणे. सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचनांचे गांभीर्य समजणे.
15. दैनंदिन भाषिक व्यवहारासाठी आवश्यक ती कौशल्ये विकसित होणे.
16. व्याकरणानुसार भाषेचा वापर करता येणे.
17. प्रमाणभाषा व बोलीभाषा यातील फरक लक्षात घेऊन योग्य त्या ठिकाणी प्रमाणभाषेचा वापर करता येणे.
18. बोलण्याची भाषा व ग्रंथभाषा यातील फरक लक्षात घेऊन भाषेचा वापर करता येणे.
19. बोली भाषेतील सृजनशील अभिव्यक्ती विकसित होणे.
20. मातृभाषेच्या विविध बोलीतील सोप्या साहित्याचा आस्वाद घेता येणे.
21. ज्ञान व मनोरंजन यासाठी अवांतर वाचनाची आवड निर्माण होणे. लेखक व कवींचा परिचय करून देणे.
22. भाषेच्या सौंदर्याचा आस्वाद घेता येणे.
23. सौंदर्यदृष्टीचा विकास होणे.
24. शब्दातील परस्पर संबंधांची माहिती होणे.
25. शब्दांच्या अर्थातील विविध छटा लक्षात घेऊन त्यांचा योग्य संदर्भात वापर करता येणे.
26. भाषेच्या माध्यमातून विचारांचा विकास होणे.
27. भाषेच्या आणि साहित्याच्या अभ्यासातून उत्तम अभिरुचीचा विकास होणे.
28. अन्य भाषातील अभिजात साहित्याची भाषांतरित वाङ्मयाच्या माध्यमातून माहिती होणे.
29. भाषा विषयक जाणीवा संपन्न आणि व्यापक होणे.
30. भाषा व साहित्याच्या अभ्यासातून व्यक्तिमत्व विकसित होणे.

# इ. 1ली ते 4थी

## पहिले क्षेत्र - श्रवण

भाषा ही श्राव्य व दृक् स्वरूपात असते. श्राव्य भाषेत श्रवण व भाषण ही उत्पादक तत्वे मूलतत्वे असून वाचन व लेखन ही दृक् तत्वे आहेत. श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही चार कौशल्ये आत्मसात केल्यास व्यक्तीमत्वाचा विकास होता.

बोलले जाणारे शब्द हे ध्वनीच्या माध्यमातून व्यक्त होतात. व्यक्त झालेले ध्वनी, अभिप्राय आणि विचार समजून घेऊन ग्रहण करणे म्हणजेच श्रवण होय.

श्रवण कौशल्य हे भाषा कौशल्यातील मूळ कौशल्य आहे, पायाभूत कौशल्य आहे. चांगले ऐकल्यास चांगले बोलले जाते व लिहिले जाते. 'श्रवण' हे जन्मापासून नव्हे तर जन्मापूर्वीपासूनच सुरू असते. उदा - अभिमन्यू. वेदकाळात ऋषीमुनी आपल्या शिष्यांना संथा देऊन लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लावत असत. म्हणून तर वेदांना श्रुती म्हणतात. श्रवणाचे महत्त्व समर्थ रामदास स्वामी सांगताना म्हणतात -

''सावध असावे अवघे चित्त
श्रवण करावे कान देत.
अनुभव साठा करण्या हेत
श्रवण शक्ती वाढवावी.''

अनुभवाचा साठा करावयाचा असेल तर श्रवण केले पाहिजे म्हणजेच ऐकले पाहिजे. उत्क्रांती काळात श्रवणशक्ती तीव्र होती. वयाच्या 20 ते 25 वर्षांपर्यंत श्रवण शक्ती तीव्र असते. कान हे एक ज्ञानेंद्रिय आहे. यापासून होणारे ज्ञान हे 11% असते. म्हणून या कौशल्याच्या वाढीसाठी प्रसंग वर्णने, परिचित प्रसंग आणि घटना तसेच वस्तू, त्यांची चित्रे दाखवून सोप्या शब्दात वर्णन केले पाहिजे.

- श्रवण करताना मुले अनेक चुका करतात. गाणी समरसून म्हणत नाहीत. अवधान जास्त वेळ टिकत नाही. ताल किंवा ठेका आपोआप धरत नाहीत. ऐकलेल्या सुचनांचे पालन करीत नाहीत. प्रतिसाद कमी देतात, हावभाव बदलत नाहीत.

यावर रामबाण उपाय म्हणजे शब्दातील अक्षरांची संख्या, जोडाक्षरांचे प्रमाण वयोगटानुसार असावेत. काही अक्षरांची पुनरावृत्ती होणारी रचना निवडावी. कवितेतील ओळींची संख्या ठरवावी. रचना काहीशी सोपी असणारे साहित्य निवडावे, सोप्या शब्दातील ध्वनीफिती ऐकवाव्यात. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करावे. विचारले जाणारे प्रश्न सोपे व निःसंदिग्ध असावेत. पाठ्यपुस्तकातील पाठ्यांशाचे प्रकट वाचन नियमित घ्यावे.

श्रवण हे कौशल्य पहिलेच आहे. इयत्ता पहिली दुसरीला श्रवण कौशल्य अति महत्त्वाचे असून यात 5-5 सामर्थ्ये आहेत. त्यांचा विकास कसा करावा हा तक्ता इयत्तावार सामर्थ्ये व कृतीतून पुढे दिलेला आहे. याचा दैनंदिन अध्यापनात उपयोग करावा. या व्यतिरिक्त आणखी कोणत्या कृती आपल्याला येत असतील तर त्यांचाही उपयोग करावा.

# दुसरे क्षेत्र - भाषण

भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पद्धत किंवा व्यवस्था. भाषा हा शब्द भाष् या मूळ धातूपासून तयार झालेला असून भाष् म्हणजे 'बोलणे'. भाषा बोलतो म्हणजे वेगवेगळे ध्वनी जीभ, ओठ इत्यादी वागिंद्रियाच्या सहाय्याने आपण काढत असतो. 'आपल्या भाव-भावना, विचार, अभिप्राय' अर्थपूर्ण शब्दात व्यक्त करणे म्हणजेच भाषण.

श्रवणानंतरचे दुसरे कौशल्य म्हणजेच 'भाषण' होय. चांगले ऐकल्यास चांगले बोलता येते. म्हणून आपल्या थोर साहित्यिकांनी सुद्धा म्हटले आहे की 'सुसंगती सदा घडो। सुजन वाक्य कानी पडो। कारण आपल्या परिसरात बोलली जाणारी भाषा मुलाच्या कानावर पडत असल्यामुळे ते सुद्धा त्याप्रमाणेच उच्चार करत असते. सुरुवातीला मुलाला आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्याच्या बोलीभाषेचा वापर करण्याची मुभा द्यावी. नंतर पुस्तकी भाषेचा टप्याटप्याने उपयोग करण्याची संधी आपण दिली पाहिजे. असे केल्यास त्याचा आत्मविश्वास वाढतो.

भाषा कौशल्यात उच्चाराला महत्त्वाचे स्थान आहे. उच्चार शुद्धता आली तर भाषेतील भाषण कौशल्य आपोआपच आले असे म्हणता येईल. या भाषण कौशल्यात इ. 1ली ते इ.4थी पर्यंतच्या प्राथमिक स्तरात विविध सामर्थ्यांचा विकास करणे आवश्यक आहे.

भाषा बोलत असताना मूल अनेक चुका करीत असते. ऐकलेली वाक्ये जशीच्या तशी पुन्हा सांगू शकत नाही. वाक्याचा क्रम चुकतो. शब्द मागे पुढे करतो. काही शब्द गाळले जातात. बोलते वेळी बोली भाषेचा वापर करतो उदा. पुढे-फुढे, म्हैस-म्हस. केंव्हा-कवा. काही अक्षरांचा योग्य उच्चार होत नाही. उदा. ष, श, क्ष,ण, न, ध, ये; जोडाक्षरांचे उच्चार नीट करू शकत नाही. अडखळत थांबत उच्चार करतो. हे सारे दोष घालविण्यासाठी इ. 1ली ते 4थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अधिक बोलते केले पाहिजे. याकरिता विविध सामर्थ्यांचा विकास करणे आवश्यक आहे.

भाषण या कौशल्यासाठी प्रथम प्रोत्साहन देऊन वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. प्रोत्साहन, वाहवा, विश्वास दर्शविल्यामुळे वातावरण मुक्त होते. मुलांतील भीती, लाजाळूपणा संकुचित वृत्ती कमी होऊन मूल विश्वासाने, उत्साहाने बोलू लागते. त्यांना अधिक बोलते करण्यासाठी सुरुवातीला वैयक्तिक माहिती विचारावी. वारंवार गाणी, गोष्टी, कथा सांगाव्यात. ध्वनीफितींचा, छोट्या छोट्या वाक्यांचा उपयोग सतत करावा. शिक्षकांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध असावेत म्हणजे मुलांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध होतील. मुलांना परिचित नसलेले नवनवे शब्द एकवावेत. असे शब्द उच्चारून घ्यावेत. छोटी नाटके, संवाद आयोजित करून मुलांना त्यात भाग घेण्यास प्रवृत्त करावे. उच्चार दोष घालविण्यास मुलांना जीभेचे व्यायाम द्यावेत.

उदा. :　1) ''काळे राळे गोरे राळे
　　राळ्यात राळे मिसळले''
　2) चटईला टाचणी टोचली.

एकंदर मुलांना अधिक बोलते करून विद्यार्थ्यांत हे कौशल्य विकसित करता येते.

# तिसरे क्षेत्र - वाचन

'वाचनाची कला म्हणजे चतुराईने यशस्वी होण्याची कला' - हॅमरला.

श्रवण, भाषण यानंतर तिसरे कौशल्य म्हणजे वाचन होय. वाचनाचे महत्त्व भाषा तज्ज्ञांनी वर सांगितलेलेच आहे. असे ही म्हटले जाते की 'वाचालं तर वाचाल'. वाचन जर असेल तर आपण जीवंत राहू शकतो. अन्न, वस्त्र निवारा या मूलभूत गरजांबरोबर सुशिक्षित माणसांची आणखी एक गरज म्हणजे शिक्षण. आणि शिक्षण हवे असल्यास वाचन हवेच हवे.

वाचन कौशल्य हा व्यक्तीत्वाच्या विकासाचा पाया आहे. स्वामी विवेकानंद, जॉने केनेडी, सी.व्ही. रामन या सुप्रसिद्ध व्यक्ती एका मिनिटात 900 ते 1000 शब्द वाचत. भरभर वाचण्याची सवय लहानपणी लावणे योग्य आहे. वाचणाचे महत्त्व सांगताना -

अक्षरे गाळून वाची। काही घाली

निगा न राखे पुस्तकांची। तो एक मुर्ख.

मुर्खांची लक्षणे सांगताना रामदासांनी वरील ओळीत वाचनाचे महत्त्व सांगितले आहे. मुले वाचताना कोणकोणत्या चुका करतात. याचा उल्लेख येथे केलेला आहे.

ध्वनीचिन्हांचे आकलन करून त्या अक्षरांचा अर्थपूर्ण उच्चारण करणे म्हणजे वाचन.

वाचनाचे तीन प्रकार आहेत.

1) चित्रवाचन 2) प्रकट वाचन 3) मौनवाचन.

प्राथमिक स्तरावर चित्रवाचन व प्रकट वाचन यांचे महत्त्व अधिक आहे. याकरिता मुलांना परिचित असलेल्या शब्दांचे वाचन करण्यास दिले असता, वाचन सोपे आणि सहज होऊ शकते. प्राथमिक स्तरात अक्षरे वाचणे, शब्द, जोडाक्षरे वाचणे, हस्ताक्षर वाचणे, प्रासबद्ध कविता, कथा वाचणे, सोप्या कथा, बालमासिके, भित्तीपत्रके वाचणे, घटनाक्रम सांगणे, वाचना नंतर कोण? कोठे? काय? कसे? या प्रश्नांची उत्तरे देणे, शब्द संग्रह वाढविणे, चित्रकथा, विनोदीकथा, छापील मजकूर वाचणे. विराम चिन्हांचा उपयोग करणे. इत्यादी वाचताना मुले अनेक चुका करतात.

⁎ मुळाक्षरे वाचताना एका अक्षरा ऐवजी दुसरेच अक्षर वाचणे.

उदा. - जसे 'क' ला 'फ' 'घ' ला 'ध' म्हणणे इत्यादी.

- ⁎ योग्य उच्चार न करणे, क-ख, च-छ, ट-ठ, त-थ, प-फ.
- ⁎ ऱ्हस्वचा दीर्घ उच्चार करणे अक्षरे सुटी सुटी वाचने.

  जसे .... ब ..... द .... क....

* स्वरचिन्हांचे विपर्यस्त वाचन उदा. औषध ऐवजी अवशध बैल ऐवजी बईल, ऐक-एक.
* अर्धे अक्षर पूर्ण वाचतो जसे शब्द, स्वतंत्र, दप्तर ऐवजी शबद, सवतंत्र, दपतर.
* वाक्य सलग पणे वाचत नाही शब्द गाळणे.
* योग्य गतीने वाचत नाही.
* अर्थ समजून घेऊन वाचत नाही.

या संभाव्य चुका टाळण्यासाठी त्याच अक्षरापासून सुरूहोणारे शब्द लिहून त्याचा सराव घ्यावा उदा. कप, कळ, धर, धरण, वगैरे याच अक्षरांचा शब्दात कोठेतरी उपयोग झालेला असावा. वर्गात पाठ्यपुस्तकाचे नियमित वैयक्तिक व सामुहिक वाचन घेतले पाहिजे. त्याच बरोबर विविध सामर्थ्यांप्रमाणे विविध प्रकारचे वाचन घेतल्यास सामर्थ्यांचा विकास होऊन वाचन कौशल्यात मुले सक्षम होतात. वाचनाचे महत्त्व किती आहे हे थोरामोठ्यांनी अनेक वेळा सांगितले आहे. अशाच प्रकारे पुस्तक वाचनापासून कोणकोणते फायदे होतात, हे सांगताना, बेळगावचे कवी अविनाश ओगले म्हणतात, वाच पुस्तके -

जगण्याचे जर भान पाहिजे, वाच पुस्तके।
जगती जर सन्मान पाहिजे, वाच पुस्तके।

ग्रंथावाचून अर्थहिन हे अवघे जीवन
जिंदगीत जर जान पाहिजे, वाच पुस्तके।

संस्कारांनी घडतो माणूस, मोठा होतो
मानाचे जर पान पाहिजे, वाच पुस्तके।

सहा रिपूंच्या हल्ल्यापासून वाचवणारा
हृदयी जर भगवान पाहिजे, वाच पुस्तके।

स्वत्व, संस्कृती, मायमराठी हवी जपाया.
मातीचा अभिमान पाहिजे, वाच पुस्तके।

# चौथे क्षेत्र – लेखन

‘सुंदर अक्षर लेहो जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे

अर्थांतर सांगो जाणे । सकळ काही

वरील श्लोकात रामदास स्वामींनी लेखनाचे महत्त्व सांगितले आहे. हस्ताक्षर सुंदर असणे हे माणसाचे भूषण समजले जाते. लेखन कौशल्य हे कठीण कौशल्य आहे. यात अनेक अवयवांचा उपयोग केला जातो. त्यामुळे हे कौशल्य आत्मसात करणे थोडे कठीण असते. म्हणून हे शिकण्याच्या कौशल्यात याचा शेवटचा क्रमांक ठेवला आहे.

लिहिणे किंवा लेखन म्हणजे ध्वनींचे सांकेतिक दृष्य रूप होय. ध्वनीनुसार जी चिन्हे असतात. त्यांना अक्षर म्हणतात. अक्षरांनी लिपी बनते. भाषेतील अक्षरांच्या समूहाला ‘वर्णमाला’ म्हणतात. वर्ण म्हणजे रंग. ‘रंगाने काढलेली चिन्हे म्हणजे अक्षरे.’ अ-क्षर म्हणजे कधीही न संपणारे. ध्वनी हवेत विरून जातात. पण आपले विचार दीर्घकाळ टिकण्यासाठी, विचार दृश्य स्वरूपात मांडणे म्हणजे लेखन. लेखन हे संपर्काचे साधन आहे.

इयत्ता 1ली ते 4थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांत हे कौशल्य वाढविण्यासाठी स्वर, व्यंजन लेखन, शब्द आणि वाक्ये लेखन, जोडाक्षरे लेखन, विरामचिन्हांचा वापर, अक्षरांचा योग्य आकार अनुलेखन, श्रुतलेखन, लयबद्ध शब्द, क्रियात्मक व्याकरण यांच्या लेखनासाठी सराव करणे आवश्यक आहे. याकरिता खालील बाबी लक्षात ठेवाव्यात.

1) हवेत बोटे फिरवून घेणे.

2) पिठ किंवा रांगोळी अथवा मातीत रेघोट्या मारून घेणे.

3) पेन्सील किंवा पेन कसे धरावे याची प्रत्यक्ष कृती करवून घेणे.

4) पाटीवर जमेल तशा रेघोट्या काढून घेणे.

5) पाटी किंवा वहीत ||| /// ≡ ƆƆƆ ∪ ∪ ⊂ ⊂ o ∞ असा सराव घेणे.

6) बाणांच्या सहाय्याने दाखविल्याप्रमाणे अक्षरे गिरविणे.

7) लिहिलेल्या अक्षरांवर बोटे फिरविणे.

8) पेन, शिसपेन्सील किंवा पेन्सीलने गिरविणे.

लेखन कौशल्य शिकविण्यासाठी अनुलेखन म्हणजे पाहून लिहिणे, श्रुतलेखन (ऐकून लिहिणे), चिन्हांचा उपयोग करणे, शब्द संग्रह वाढविणे, वर्णनात्मक वाक्ये लिहिणे व सृजनशीलतेला वाव देणे इत्यादी बाबी आल्या पाहिजेत. हे करीत असताना मुले काही चुका करतात.

उदा. - अक्षर वळणदार काढत नाहीत. स्वरचिन्हे प्रमाणबद्ध काढली जात नाहीत. वेलांटी, उकार इत्यादी, अक्षरांपासून लांब ठेवले जातात. अनुलेखन अथवा श्रुतलेखन करताना ऱ्हस्व/दीर्घांच्या चुका करतात. जोडाक्षरे चुकीची लिहितात. उदा. विश्रांती-विशरांती, आशीर्वाद-आशीरवाद, गुप्त-गुत्प इ. वाक्यलेखन करताना शब्दातील दोन अक्षरांत किंवा वाक्यातील दोन शब्दात योग्य अंतर राखता येत नाही. पहिल्या शब्दातील शेवटचे अक्षर/अक्षरे यांना जोडली जातात. उदा. येथे कचरा टाकू नये, येथे कचरा टाकून ये.

लिहिताना परिच्छेद पाडले जात नाहीत. समास सोडला जात नाही. पूर्ण वाक्यात उत्तरे लिहिताना पूर्ण वाक्यात लिहिता येत नाहीत. या चुका टाळून विद्यार्थ्यांचे अक्षर सुवाच्य होण्यासाठी खालील अंश लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

- इयत्ता पहिलीपासून आदर्श अक्षरवळणाचा प्रयत्न व्हावा.
- मोठ्या अक्षरांचे नुमने/तक्ते विद्यार्थ्यांसमोर सतत राहावेत.
- योग्य अंतराची दुरेघी वही अथवा पाट्या वापराव्यात.
- अक्षर सुधार कृती संशोधनाद्वारे अक्षर वळण सुधारण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न चालू राहावा.
- पाटी, दोन रेघी वही, चाररेघी वही, एकरेघी वही यांचा इयत्तेनुसार वापर करावा.
- इयत्ता 3री व 4थी करिता श्रुतलेखन व अनुलेखन घेणे आवश्यक असते.
- अनुलेखनासाठी पाठ्यपुस्तक वापरावे आणि श्रुतलेखनासाठी साधारणतः पाच पाच ओळींचे वेगवेगळ्या विषयांवर लिहिलेले विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाशी संबंधित उतारे संग्रहीत ठेवावेत.
- लेखन करताना कसे बसावे याचे मार्गदर्शन करावे.
- पेन्सील, पेन कसे धरावे याचे मार्गदर्शन करावे.
- आदर्श लेखनाचे नमुने विद्यार्थ्यांसमोर लावावेत.
- लिहिताना पाटी/वही व डोळे यात किती अंतर असावे याकडे लक्ष द्यावे.
- वर्गातील फळ्यावर सुद्धा चार रेघा मारलेल्या असाव्यात. शिक्षकाने 'चार रेघी' मध्येच लिहावे.

  इत्यादी मुद्यांचे आपण पालन केल्यास रामदासांनी म्हटल्याप्रमाणे 'सुंदर अक्षर लेहो जाणे' हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांत निर्माण करता येईल. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत प्रत्येकी 4 सामर्थ्ये दिलेली आहेत. त्यांचा विकास केल्यास सुंदर अक्षर हे विद्यार्थ्यांचे भूषण ठरेल.
- सुंदर हस्ताक्षराचे प्रयत्न पुढे त्याला कंप्यूटरचा 'माऊस' नियंत्रणास उपयोगी पडेल.

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - श्रवण (Listening)**

**(इयत्ता पहिली ते पाचवी करीता - Std. I to V)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 1 | इयत्ता 2 | इयत्ता 3 | इयत्ता 4 | इयत्ता 5 |
|---|---|---|---|---|
| 1) परिसरातील प्रचलीत, लोकप्रिय, शब्द, गीते, कथा यांचे श्रवण करून अर्थ समजून घेणे. | 1) सोपी आणि प्रचलित नसलेली गीते, कथा, श्रवण करून अर्थग्रहण करणे. | 1) निवेदन, विवरणे, शब्दकोडी, उखाणे यांच्या श्रवणाबरोबरच अर्थग्रहण करणे. | 1) परिचित प्रसंगातील साध्या संभाषणाच्या श्रवणाबरोबर अर्थ ग्रहण करणे. | 1) कविता, बालगीते, हावभावा-बरोबरच स्पष्ट उच्चारासह म्हणता येणे. |
| 2) परीचित प्रसंगातील संभाषणे आणि संवाद यांचा अर्थ समजून घेणे. | 2) परीचित प्रसंगातील संभाषणे आणि संवाद यांचा अर्थ समजून घेणे. | 2) अपरिचित प्रसंगातील संभाषणे व संवाद यांचा अर्थ समजून घेणे. | 2) अपरिचित प्रसंगातील संभाषणे आणि संवाद यांचा अर्थ समजून घेणे. | 2) त्या कवितेत प्रतिपादित केलेले मूल्य समजणे. |
| 3) परिचित प्रसंगातील सोप्या सुचनांचा अर्थ समजून घेणे. | 3) तोंडी सूचनांचा अर्थ समजून घेऊन कृती करणे. | 3) खेळखेळण्यासाठी व सोप्या कृती करण्यासाठी दिलेल्या तोंडी सुचनांचा अर्थ ग्रहण करणे. | 3) कृती करण्यापूर्वी दिलेल्या तोंडी सूचनांचा अर्थ ग्रहण करणे. | 3) श्रवण झाल्यानंतर किंवा संवाद सादरीकरणानंतर का? काय? कसे? केव्हा? कोठे? अशा प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे देता आली पाहिजेत. |
| 4) छोट्या पाठात सांगितलेली माहिती लक्षात ठेवणे. | 4) छोट्या पाठातील घटना क्रमवार लक्षात ठेवणे. | 4) शिकविलेल्या पाठातील मुख्य विषय ग्रहण करणे. | 4) कथन केलेल्या माहितीतील कल्पना व घटना यांचा संबंध ओळखून कारण व परिणाम जाणून घेणे. | 4) प्रसंग कोणता होता? कोठे घडला असावा? हे सांगता आले पाहिजे. |
| 5) श्रवणानंतर कोण? केव्हा? कोठे? अशा स्वरूपातील प्रश्नांची उत्तरे देता येणे. | 5) श्रवणानंतर काय? कसे? या स्वरूपातील प्रश्नांची उत्तरे देता येणे. | 5) पाठ्याशांच्या श्रवणानंतर का? कसे? कधी? या प्रश्नांची उत्तरे देता येणे. | 5) श्रवणानंतर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता येणे. काय? आणि पासून या शब्दप्रयोगातून पूर्ण वाक्यात उत्तरे देणे. | 5) ज्ञान, आकलन, उपयोजन व कौशल्य या उद्दीष्टांचे मूल्यमापन करण्यासाठी तोंडी परीक्षा व कृती आधारित परीक्षा घ्याव्यात. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - भाषण (Speaking)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 1 | इयत्ता 2 | इयत्ता 3 | इयत्ता 4 | इयत्ता 5 |
|---|---|---|---|---|
| 1) सोपे शब्द, सोपी वाक्ये अचूक उच्चारणे. | 1) श्रवणानंतर काय? कोण? या स्वरूपाच्या प्रश्नांना उत्तरे देणे. | 1) पाठाच्या श्रवणानंतर का? या प्रश्नाचे उत्तर देणे. | 1) श्रवणानंतर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता येणे काय आणि पासून या शब्दांचा वापर करून उत्तरे देता येणे. | 1) न अडखळता सहज बोलणे. |
| 2) सुलभ, लयबद्ध रचना, कविता, गाणी साभिनय सामुहिकरित्या गाता येणे. | 2) गाणी व कविता वैयक्तिक आणि सामुहिक रित्या गाणे. | 2) आवाजात योग्य चढ-उतारासह, अभिनयाद्वारे सोप्या कथा सांगता येणे. | 2) पाठांतर केलेला भाग क्रमवार म्हणून दाखविणे. | 2) परिचित सोप्या विषयावर बोलणे. |
| 3) सोप्या प्रश्नांची उत्तरे होय / नाही अशारितीने देणे. | 3) सोप्या प्रश्नांची उत्तरे देणे. | 3) परिचित वस्तूंची माहिती सांगणे. | 3) अपरिचित वस्तूंची माहिती सांगणे. | 3) प्रसंग व घटनांचे वर्णन करता येणे. |
| 4) प्रश्न विचारणे. | 4) योग्य रितीने गाणे. | 4) संवादात भाग घेणे. | 4) वर्गातील सुलभ चर्चेत भाग घेणे. | 4) नाटक, चर्चा, इतर स्पर्धा यात भाग घेऊन स्वतंत्रपणे विचार मांडता येणे. |
| 5) नम्रतेने बोलणे. | 5) नम्रतेने बोलणे व इतरांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणे. | 5) गटवार चर्चेत भाग घेताना आपल्या पाळीची वाट पहाणे. | 5) औपचारिक व अनौपचारिक भाषातील फरक ओळखणे. | 5) औपचारिक आणि अनौपचारिक प्रसंगी भाषेचा वापर करता येणे. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - वाचन (Reading)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 1 | इयत्ता 2 | इयत्ता 3 | इयत्ता 4 | इयत्ता 5 |
|---|---|---|---|---|
| 1) वर्णमालेतील अक्षरे ओळखणे सोपे शब्द ओळखून वाचणे. | 1) सुटी सुटी अक्षरे आणि जोडाक्षरे ओळखणे. | 1) रस्त्यावरील चिन्हे आणि सूचना फलक यांचे वाचन करणे. | 1) चित्रकथा, शब्दपट्ट्या आणि भित्तीपत्रके यांचे वाचन. | 1) चित्रे, तक्ते, नकाशे भित्तीपत्रके यांचे वाचन. |
| 2) मुद्रीत अक्षरे, शब्द आणि फलक लेखन, फ्लॅशकार्डावरील ठळक अक्षरे वाचता येणे. | 2) मोठी व लहान मुद्रित अक्षरे वाचणे. | 2) इतरांचे हस्ताक्षर वाचणे. | 2) हस्ताक्षरातील मजकूर वाचणे. | 2) हस्तलिखित, छोट्या कथा, बाल साहित्याचे वाचन. |
| 3) तीन अक्षरी शब्द मोठ्याने वाचणे. | 3) लयबद्ध रचना छोटीगीते आणि सोप्या कथा मोठ्याने वाचणे. | 3) सोप्या गोष्टींची पुस्तके व इतर बालसाहित्य वाचणे. | 3) बालमासिके, दैनिकातील मजकूर यांचे वाचन करून घेणे. | 3) वर्तमानपत्रे आणि इतर मुद्रित लेखन वाचणे. |
| 4) सुमारे 1500 शब्दांचे वाचन व आकलन. | 4) सुमारे 2000 शब्दांचे वाचन व आकलन. | 4) घटना क्रमवार ओळखणे पाठातील मुख्य विषय ओळखणे. | 4) सुमारे 4000 शब्दांचे वाचन व लेखन. | 4) सुमारे 5000 शब्दांचे वाचन. व लेखन. |
| | | 5) एखादा पाठ वाचल्यानंतर केव्हा? कोण? आणि काय? अशा प्रकारच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास समर्थ असणे. | 5) लिखित माहितीतील घटना, कल्पना यामधील सबंध व परिणाम ओळखणे. | 5) दिलेल्या लेखी पाठातील माहितीवरून तर्क करून अनुमान काढणे. |
| | | 6) सुमारे 3000 शब्दांचे वाचन व आकलन. | 6) पाठाचे वाचन झाल्यानंतर कसे? व का? या प्रश्नांची उत्तरे देण्यास समर्थ होणे. | 6) पाठाच्या वाचनानंतर असे का? असे झाले तर? कोठपर्यंत अशा प्रश्नांची उत्तरे मिळविणे. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - लेखन (Writing)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 1 | इयत्ता 2 | इयत्ता 3 | इयत्ता 4 | इयत्ता 5 |
|---|---|---|---|---|
| 1) वर्णमालेतील अक्षरे व जोडाक्षरे यांचे अनुलेखन करणे. | 1) जोडाक्षरी शब्द आणि वाक्यांचे अनुलेखन करणे. | 1) अक्षरांचा क्रम व आकार यांना अनुसरून अक्षरे आणि शब्द यांच्यात योग्य अंतर ठेवून लिहिणे. | 1) लेखन विषयक नियमांचा अवलंब करून योग्य गती लेखनात अवलंबणे. | 1) योग्य क्रमाने, योग्य अंतर सोडून, सुवाच्य व स्पष्ट अक्षरात वाक्य आणि परिच्छेद लिहिता येणे. |
| 2) श्रुत लेखनाद्वारे सुलभ अक्षरे आणि जोडाक्षरे लिहिणे. | 2) जोडाक्षरे आणि परिचित सोप्या शब्दांचे श्रुत लेखन करणे. | 2) अपरिचित शब्दांचे श्रुत लेखन करणे. | 2) अपरिचित छोट्या परिच्छेदाचे श्रुतलेखन करणे. | 2) श्रुत लेखन करताना आवाजातील चढउतार लक्षात घेऊन योग्य विराम चिन्हांचा वापर करून स्वतंत्रपणे लेखन करता येणे. |
| 3) सोपे, परिचित शब्द आणि वाक्ये लिहिणे. | 3) मार्गदर्शित सोपी, विवरणात्मक वाक्य लिहिणे. | 3) सोप्या आणि मार्गदर्शनपर वाक्यांचे लेखन करणे. | 3) छोट्या परिच्छेदाचे अनुलेखन करणे. | 3) सुलभ विषयांसंबंधीची छोटी अनौपचारिक पत्रे, संवाद लेखन स्वतंत्रपणे करता येणे. |
| 4) पद्यातील व गद्यातील लयबद्ध अक्षरे व शब्द यांचे आकलन. | 4) शब्दातील लयबद्धता ओळखणे. | 4) शब्दातील अर्थाचा संबंध ओळखणे. | 4) जर-तर, केव्हा-जेव्हा, जसे-तसे, आणि, व अशा शब्दांचा वपर करून संयुक्त वाक्य बनविणे. | 4) क्रियात्मक व्याकरणाचा अर्थ समजून घेऊन लिहिताना त्याचा योग्य वापर करता येणे. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - श्रवण (Listening)**

**(इयत्ता सहावी ते आठवी करीता - Std. VI to VIII)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

**अध्ययनांश**

| इयत्ता 6 | इयत्ता 7 | इयत्ता 8 |
|---|---|---|
| 1) संवाद, चर्चा आणि नाटक यांचे श्रवण करून अभिनयास योग्य असे आकलन करून घेणे. | 1) कविता, कथा, नाटक, निबंध, प्रहसन आणि विचार प्रवाह श्रवण करून अर्थ समजून घेणे. | 1) लक्षपूर्वक श्रवण करतो. बोली व प्रमाण भाषेतील फरक ग्रहण करतो. श्रवण केलेले पुन्हा सांगतो. |
| 2) अपरिचीत प्रसंग, घटना आणि चर्चा यातील संभाषणे ऐकून त्यांचे अर्थपूर्ण ग्रहण करणे. | 2) गटवार कृती आणि अपरिचित प्रसंग व घटना यांचे लक्षपूर्वक श्रवण करून व पाहून त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 2) विषयासंबंधी इतर माहिती ऐकण्यास प्रवृत्त होतो. |
| 3) गटवार होणाऱ्या कृतींचे श्रवण निरीक्षण करून दिलेल्या विषयानुसार अनुभव घेणे. | 3) विषय श्रवणानंतर प्रतिक्रियेच्या स्वरूपात का? कोठे? कसे? या प्रकारचे प्रश्न मनात निर्माण करून विषय विश्लेषण करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 3) पाठ्यविषयाची मध्यवर्ती कल्पना श्रवणाने समजून घेतो. |
| 4) विषयाचे श्रवण करून प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे सामर्थ्य यावे. का? कोठे? कसे? असे झाले तर? असे असते तर? अशाप्रकारचे विचारतरंग मनात निर्माण व्हावेत. | | 4) दुसऱ्यांच्या मतांचा, विचारांचा, मंडन-खंडनाचा श्रवणाने आदर करतो. |
| | | 5) दुसऱ्याचे ऐकून स्वतः स्वतंत्र विचार करतो. |
| | | 6) श्रोता म्हणून वर्गात, शाळेत व शाळा बाहय कार्यक्रमात समरसून ऐकतो. |
| | | 7) श्रोता म्हणून ऐकलेल्या विषयावर स्वतःच्या संकल्पनेतून बोलून प्रतिसाद देतो. |
| | | 8) बोली व प्रमाण भाषेबाबत जागृती दाखवतो. |
| | | 9) शाळा व शाळा बाह्य कार्यक्रमाची नोंद घेतो. |
| | | 10) दुसऱ्यांच्या विचारांचा आदर करतो. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - भाषण (Speaking)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 6 | इयत्ता 7 | इयत्ता 8 |
|---|---|---|
| 1) दिलेल्या विषयानुसार सहज न अडखळता संवाद व चर्चा यांचे कथन करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 1) विषयानुसार सहजतेने चर्चा आणि संवाद करण्याचे सामर्थ्य यावे. | 1) शाळेतील विविध सांघिक कार्यात बोलतो. भाषा बोलून विचार व्यक्त करतो. |
| 2) प्रसंग व घटना यांचे स्पष्ट वर्णन करता यावे. | 2) प्रसंग आणि घटना याबद्दल न अडखळता स्पष्टपणे बोलता यावे. शेजाऱ्याशी बोलताना आदराने मर्यादापूर्वक संभाषण करण्याचे सामर्थ्य यावे. | 2) प्रश्न विचारतो, उत्तरे देतो, माहिती सांगतो. |
| 3) नवीन विषयाचे लक्षपूर्वक श्रवण करून त्याचा बोलताना स्पष्ट उपयोग करावा. स्वतंत्र विचार व्यक्त करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 3) म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, शब्दसमुह यांचा वापर करून कलात्मक संभाषण करता यावे. | 3) संभाषण करून सामुहिक चर्चेत सहभागी होतो. |
| 4) वडीलधारी व्यक्तीबरोबर बोलताना आदराने किंवा गौरवपूर्ण संभाषण करावे. थोरांबाबत बोलताना भावपूर्ण परिणामकारक अभिव्यक्ती करावी. | | 4) घरगुती प्रसंगाचे वर्णन करून सांगतो. |
| | | 5) साध्या सोप्या आणि आपल्या भाषेत विचार व्यक्त करतो. |
| | | 6) भाषणाचा प्रारंभ, विषय विस्तार आणि समारोप करता येतो. |
| | | 7) प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या प्रसंगातील महत्त्वाच्या घटना सादर करतो. |
| | | 8) कविता वाचन, गायन करून भाषणाद्वारे साहित्याची प्रशंसा व्यक्त करतो. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - वाचन (Reading)** **विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 6 | इयत्ता 7 | इयत्ता 8 |
|---|---|---|
| 1) विशिष्ट अक्षरांचे ध्वनी आणि त्यातील फरकांचे अर्थ लक्षात घेऊन वाचणे. | 1) विशिष्ट शब्दांचा प्रयोग करून ध्वनीची साम्यता आणि फरक ओळखून वाचन करण्याचे सामर्थ्य यावे. | 1) काल्पनिक, माहितीपर, आणि आठवीच्या स्तरास योग्य असे विविध साहित्य प्रकार - मुद्रित आणि इतर माध्यमातून (टी.व्ही. इंटरनेट इ.) मिळवून वाचतो. |
| 2) वाक्य, म्हणी, वाक्प्रचार यांचा स्पष्टपणे अर्थ समजून घेऊन त्याची वृद्धी करण्याचे सामर्थ्य वाढविणे. | 2) परिच्छेद म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, सुभाषिते यांचे वाचन करून त्यांचा अर्थ समजून घेण्याचे सामर्थ्य वाढविणे. | 2) कथेचा सकारात्मक शेवट व कथेतील जीवन मूल्ये दर्शविणारी पात्रे लक्षात ठेवतो. |
| 3) वाचलेल्या विषयांचे आणि त्यातील विचारांचे तत्त्व आणि तर्क याचे अनुमान काढण्याचे सामर्थ्य दृढ करणे. | 3) विषयाचे वाचन करून त्यातील विचारांचे आलोचनात्मक आकलन करून घेऊन तर्काने निर्णयाप्रत येण्याचे सामर्थ्य रुजवावे. | 3) वाचन करून माहिती आणि इतर साहित्य प्रकारातील मध्यवर्ती कल्पनेचे ग्रहण करतो. |
| 4) पाठाव्यतिरिक्त अन्य विषयांचे वाचन करून अर्थ समजून घेणे वर्तमानपत्रे, मासिके, बालकथा, चित्रकथा, हस्तलिखित यांचे वाचन करून अर्थ समजून घेणे. या आधारावर कोठे? कसे? कशामुळे? काय? कोण? अशा प्रश्नांची उत्तरे स्पष्टपणे देता येण्याचे सामर्थ्य वाढविणे. | 4) मुलांनी उपयुक्त असे अवांतर वाचन करून अर्थ ग्रहण करण्याचे सामर्थ्य वाढवावे. वाचलेल्या साहित्यावर प्रश्न विचारून, निर्माण करून अनुमान काढावे. | 4) वाचनातूनच पाठ्यांशाचे विश्लेषण, समाजात दिसून येणारे साहित्याशी सलग्न असलेले दाखले; संस्कृतीचे विशिष्ट उद्देश आदि मूल्ये ग्रहण करतो. |
| 5) सुमारे 6000 शब्दांचे वाचन वैयक्तिकरित्या करून त्याचा अर्थ ग्रहण करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 5) अलंकारिक भाषेचे लेखन, ध्वनिचिन्हांच्या भावार्थासह वाचता यावे. | 5) अपरिचित प्रसंग किंवा पाठ्येतर साहित्य आठवीच्या अपेक्षित स्तरापर्यंत समजून घेतो. (उदा. नाटक, सिनेमा, टी.व्ही. कार्यक्रम, ध्वनिमुद्रित कार्यक्रम या बद्दलचे मुद्रित साहित्य वाचून त्याचा आनंद घेतो.) |
| | 6) सुमारे 7000 शब्दांचे स्वतंत्रपणे वाचन करून त्या शब्दांचे अर्थग्रहण करण्याचे सामर्थ्य वाढविणे. | 6) वाचन करतानाच विश्लेषण, संकलन, सुविचारांचे मंडन इ. मूल्ये आत्मसात करतो. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - लेखन (Writing)** **विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 6 | इयत्ता 7 | इयत्ता 8 |
|---|---|---|
| 1) शब्दसमूह, म्हणी आणि वाक्प्रचार यांचा वापर करून स्वतंत्रपणे वाक्यरचना करता यावी. त्यांचा संदर्भ, अर्थ परिणामकारक लिहिता यावा. | 1) परिच्छेदाचे विवरण, नवकल्पना, समानार्थी, विरुद्धार्थी, अनेकार्थी शब्दांचे आकलन करून घेऊन लेखन कार्यात या सर्वांचा उपयोग करण्याचे सामर्थ्य वाढविणे. | 1) परिचित आणि अपरिचित विषयावर स्तराला अनुसरून परिच्छेदात्मक, सुसंगत लेखन करतो. |
| 2) कथा, विवरणात्मक परिच्छेद, कवितेचा भावार्थ, संवाद याद्वारे लेखन करण्याचे प्रोत्साहन द्यावे. | 2) कवितेचा सारांश लिहिता येणे. कथा, छोटे संवाद, कथेतील मुख्य कल्पना यांचे लेखन करण्यास प्रवृत्त करणे. | 2) आठवीच्या योग्यतेचे असे विषय स्वतःच्या मनाने स्वतंत्रपणे रीती प्रमाणे लिहितो - उदा. अर्ज लेखन, पत्र, एखाद्या कथेचा किंवा प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनेचा सारांश, वाचलेल्या, ऐकलेल्या प्रसंगाची माहिती. |
| 3) वाचलेल्या अथवा बोललेल्या शब्द ध्वनींचे स्वर लक्षात घेऊन श्रुतलेखन करता यावे. लेखन करताना विरामचिन्हाचा योग्य ठिकाणी वापर करून अर्थपूर्ण लेखन करण्याचे सामर्थ्य यावे. | 3) वाचलेले किंवा संभाषणातले शब्द ऐकून स्वराघाताप्रमाणे शुद्ध लिहिण्यास प्राप्त कौशल्य मिळवून देणे. | 3) लेखनात योग्य अशी सुभाषिते, लोकोक्ती, वाक्प्रचार, म्हणी, इत्यादी साहित्यिक वैशिष्ट्य उपयोगात आणतो. शैलीदार लेखन करण्याचा प्रयत्न करतो. परिच्छेदात्मक, कवितेच्या ओळी उद्‌धृत केल्या तर त्या कोठे? कशा प्रकारे? लिहाव्यात याचे भान ठेवून लिहितो. |
| 4) विविध नमुन्यातील पत्रे, प्रसंग, वर्णने, प्रवासवर्णने व विविध विषयांच्या आधारावर छोटे छोटे निबंध आणि परिच्छेद लिहिण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. | 4) रचनात्मक लेखन करण्यास कथा, कविता, पत्र यांच्या अभ्यासाने उद्युक्त करणे. | 4) कथा, चरित्रात्मक पाठ, कविता यांचा आशय समजून घेऊन त्यावरील टीपा लिहितो. |
| 5) क्रियात्मक व्याकरण आणि त्यांचे नियम ग्रहण करून भाषा अभिवृद्धीसाठी अर्थपूर्ण लेखन करण्याचे सामर्थ्य यावे. | 5) क्रियात्मक व्याकरणाच्या नियमांना अनुसरून भाषेच्या अभ्यासाची वृद्धी होईल असे लेखन करता येणे. | 5) • साध्या, सोप्या कविता लिहितो. • कथा व साधे संवाद लिहितो. • लेखन स्वातंत्र्य जोपासतो. |
| | 6) छंद, शास्त्राचा परिचय व्हावा म्हणून लघु-गुरू खुणांचा अर्थ ग्रहण करणे आणि मात्रा लेखन करणे. | 6) • शब्दयोगी उभयान्वयी आणि केवलप्रयोगी अव्यये समजून घेतो. • प्रयोग - कर्तरी, कर्मणी, भावे ओळखतो. •काळ - वर्तमान. भविष्यकाळ, भूतकाळ. •प्रश्नांची रचना करतो. •अलंकाराची प्राथमिक माहिती घेतो. |

# इ. 9वी ते 1०वी

दैनंदिन व्यवहाराच्या भाषेवर विद्यार्थ्यांना प्रभूत्व मिळवता येणे आणि साहित्यिक परिभाषेचा परिचय करून देणे ही माध्यमिक स्तरावरील भाषा शिक्षणाची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. औपचारिक तसेच अनौपचारिक प्रसंगाला अनुसरून भाषेचा उपयोग कसा करावा हे विद्यार्थ्यांना कळावे ही गोष्ट येथे महत्त्वाची ठरते. बोलणे व लिहिणे या भाषेच्या सामर्थ्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये परिपक्वता यावी ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. त्याचबरोबर जे काही विद्यार्थी ऐकतील व वाचतील त्यासंबंधी बोलून अथवा लिहून आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये यायला हवी. त्यांच्या शब्दसंग्रहात येथोचित पारिभाषिक शब्दांची भर पडत जावी व शब्दांचे लाक्षणिक व सूचित अर्थही त्यांना ओळखता यावेत ही गोष्ट 9वी व 10वी मध्ये विशेषतः साध्य व्हावी. दैनंदिन व्यवहाराच्या भाषेचा अधिकाधिक विकास साधता यावा. 10 वी अखेर विद्यार्थी सहजपणे दैनंदिन भाषेचा उपयोग करू शकेल असे पहावे.

माध्यमिक शिक्षणात भाषा शिक्षणाबरोबरच साहित्याच्या अभ्यासावर विशेष भर देणे आवश्यक आहे. तसेच वर्गातून त्यांच्या दर्जानुसार विद्यार्थ्यांना अनुरूप गद्यात्मक व पद्यात्मक साहित्य वाचावयास द्याायला हवे. साहित्यकृतीच्या आधारे मनाची महानता व भावनांची विविधता विद्यार्थ्यांना कळावी, शिवाय प्रत्येक विद्यार्थ्याला अभ्यासापेक्षा प्रत्येक साहित्यकृतीवर आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्याची संधी मिळायला हवी. साहित्याचे शिक्षण एक कला म्हणून व्हावे ते ज्ञानाचे केवळ साधन म्हणून नव्हे. बोलण्याच्या स्वरूपात आत्मविष्कार करणे आणि चिंतनाची क्षमता वाढविणे या गोष्टी अंमलात याव्यात. बोलण्याची क्षमता लाभली म्हणजे गहन विषयही सहजपणे सोपा करून सांगता येतो. विद्यार्थ्यांच्या आकलनाचा अंदाज शिक्षकाला घेता येतो.

ज्याचा अनुभव व्यापक असतो त्यांना ऐकलेल्या व वाचलेल्या गोष्टी लवकर समजतात. अनुभवांची व्यापकता ही सभोवतालच्या जीवनाच्या जाणीवपूर्वक केलेल्या निरीक्षणानेच येऊ शकते. यासाठी रेडिओ व दूरदर्शनावरील कार्यक्रम नीट पाहणे-ऐकणे, विपूल प्रवास आणि विविध विषयावरील पुस्तकांचे व नियतकालीकाचे वाचन करणे आवश्यक ठरते.

ऐकणे, बोलणे, वाचणे, लिहिणे या भाषेच्या चार कौशल्यामध्ये नैपुण्य प्राप्त करण्यासाठी व्याकरणाच्या अभ्यासाची मदत होते. उच्च प्राथमिक वर्गामध्ये व्याकरणाचा केवळ स्थूल असा आराखडा दिला जातो तर माध्यमिक शिक्षणामध्ये त्यातील मुख्य तत्त्वांची ओळख करून दिली जाते.

**भाषा शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्ट्ये (General Learning standards for High School Section):-**

- भाषा शुद्धता आणि विचार परिणामकारक पद्धतीने व्यक्त करण्याची योग्यता यांचा विकास करणे.
- आकलन आणि अभिव्यक्ती यांची क्षमता वाढविणे.
- विद्यार्थ्याचे शब्दभांडार विकसित करणे.
- वाचन लेखन आकलन आणि स्वतंत्र अभिव्यक्ती इत्यादी कौशल्यात वाढ करणे.
- ज्ञानप्राप्तीप्रमाणेच आनंदप्राप्तीसाठी वाचनाची आवड निर्माण करणे.
- साहित्य आणि कलेचा आस्वाद घेण्याची क्षमता विकसित करणे.
- विद्यार्थ्यांच्या ठिकाणी सौंदर्यास्वाद आणि निर्मिती क्षमता या वृत्तींची जोपासना करणे.
- मातृभाषेद्वारे विद्यार्थ्यांच्या ठिकाणी मानवी जीवन मूल्यांचा संस्कार घडविणे.
- मातृभाषेतील विविध साहित्यिकांची आणि विविध साहित्य प्रकारांची ओळख करून देणे.
- विद्यार्थ्यांची विचार आणि चिंतन करण्याची क्षमता वाढविणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात आपली भाषा, साहित्य, संस्कृती, राष्ट्र आणि मानवसमाज याविषयी आदर व प्रेमाची भावना निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये अन्य भाषाभगिनी तसेच मराठीच्या विविध बोली भाषाबद्दल आपुलकी निर्माण करणे.
- स्वदेशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव नैतिकमूल्ये, निसर्गप्रेम, श्रमातील आनंद आणि समाज जाणीव गुणांची जोपासना करणे.
- चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट इ. माध्यमांद्वारे भाषिक अनुभव वाढविणे.
- अर्थ समजून घेऊन ऐकण्याची आणि वाचण्याची क्षमता वाढविणे.
- साहित्याच्या विविध प्रकारांचा परिचय करून देणे.
- विद्यार्थ्यांचे सौंदर्यविषयक प्रेम वाढविणे, त्यांच्या अंगिक गुणांचा विकास करणे, त्यांच्या कल्पकतेला अधिक वाव देणे आणि सृजनात्मकता वाढविणे.
- अनुभववृद्धी व व्यक्तिमत्वाचा विकास साधणे.

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - श्रवण (Listening)**

**(इयत्ता नववी आणि दहावी करीता - Std. IX to X)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 9 | इयत्ता 10 |
|---|---|
| 1) विचारांचे श्रवण करतो, ग्रहण करतो आणि मंडनाची तयारी ठेवतो. | 1) भाषा अभिव्यक्तीचा तुलनात्मक अभ्यास करतो. |
| 2) पाठ्यांशाचे विश्लेषण करतो. | 2) शब्दांचा सरळ अर्थ आणि भावार्थ ग्रहण करतो. |
| 3) शब्दसंग्रह वाढवतो. | 3) शब्द छटा समजून घेतो. |
| 4) मध्यवर्ती कल्पनेचे आकलन करून घेतो. | 4) घटनाक्रम लक्षात ठेवतो. |
| 5) स्वगत आणि संवाद लक्षपूर्वक ऐकतो. | 5) भाषण, संवाद, कथनातील मध्यवर्ती कल्पना समजून घेतो. |
| 6) शब्दांचे आणि वाक्यांचे श्रवणातून वर्गिकरण करतो. | 6) चर्चा विमर्शातून निर्णयाप्रत येतो. |
| 7) वाक्यातील, घटकामधील फरक व तुलना समजून घेतो. | 7) नैतिक आणि सांस्कृतिक मूल्ये श्रवणातून ग्रहण करतो. |
| 8) लक्षपूर्वक ऐकतो, ऐकतानाच आशयाची निवड करतो आणि परिणामकारकतेला प्राधान्य देतो. | 8) वस्तूस्थिती, काल्पनिक, पौराणिक जाणून घेतो. |
| 9) वाचन व चर्चा ऐकतो. | 9) आत्मनिरीक्षण, विविध संवादांचा भावार्थ ग्रहण करतो. |
| 10) योग्य संपर्क साधण्यासाठी ऐकतो. | 10) काव्यातील विविध साहित्य प्रकारांची माहिती करून घेतो. |
| 11) ध्वनिमुद्रित (Recorded) बोलणे, संवाद, गीते, संगीत ऐकतो. | 11) अलंकार, वृत्ते, छंद यांचा उपयोग करतो. |
| 12) स्मरणशक्ती वाढविण्यासाठी ऐकतो. | 12) दृक-श्राव्य उपकरणांचा ज्ञान आणि मनोरंजनासाठी उपयोग करतो. |
| 13) माहिती मिळवणे आणि निर्णय घेणे म्हणून ऐकतो. | 13) श्रवणातून स्वतःची भाषा शुद्धी तपासून घेतो. |
| 14) वक्त्याची शैली (आवाजातील चढउतार) श्रवणातून आत्मसात करतो. | 14) इयत्ता आठवी व नववीच्या व्याकरणांची उजळणी श्रवणातून करून घेतो. |
| 15) कथा, कविता, नाट्यसंवादाचे परिणामकारक श्रवण करतो. | |
| 16) सार्वजनिक सभा, संमेलनातून, रेडिओ, टी.व्ही. इ. कार्यक्रमातून श्रवण कौशल्य वाढवितो. | |
| 17) श्रवणातून लेखक, कवी अथवा त्या पात्रांचे भाव ग्रहण करतो. | |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - भाषण (Speaking)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

**अध्ययनांश**

| इयत्ता 9 | इयत्ता 10 |
|---|---|
| 1) भाषणातून शंकासमाधान, प्रतिसाद प्राप्त करून वैचारिक प्रश्न विचारतो. | 1) एखाद्या घटनेवर विश्लेषण, टिप्पण, तुलना करतो. |
| 2) मध्यवर्ती कल्पना, आशय शब्दात सांगतो. | 2) स्वभाषेत विचार मांडतो. |
| 3) सामुहिक चर्चेत सहभाग घेतो. | 3) मंडन, खंडन, सहमती दर्शवितो. |
| 4) पाठ्यांशावर सृजनात्मक व विश्लेषणात्मक प्रतिसाद देतो. | 4) क्रियात्मक स्वभाषा बोलतो. |
| 5) पाठ्यांशावरून त्याच प्रकारचे दाखले, विरोधी मत इ. नोंदवितो. | 5) वाक्प्रचार, लोकोक्ती व म्हणींचा वापर करतो. |
| 6) कविता चालीवर गातो. कवितेचे भावपूर्ण प्रकट वाचन करतो. | 6) बोलताना योग्य ठिकाणी थांबतो, सुचित करतो, शैलीदार व सफाईदारपणे बोलतो. |
| 7) उदाहरणे किंवा स्वतःचे अनुभव कथन करून विषय रंगवितो. | 7) वृत्तपत्रे व लेख इ. दाखले देतो. |
| 8) स्वतःचे किंवा कवीचे कवन भाषणात सांगतो. | 8) सुसंगत माहिती सांगतो. |
| 9) बोलताना ताल, लय, देहबोली सांभाळतो. | 9) अनुमान काढतो. |
| 10) ध्वनिचा अर्थबोध होतो. | 10) योग्य प्रमाणात स्वराघात देतो. |
| 11) योग्य शब्दांची व वाक्प्रकारांची निवड करतो. | 11) देहबोलीचा वापर करतो. |
| 12) चर्चेत योग्य व सफाईदारपणे बोलतो. | 12) संस्कारित भाषण मोजक्या शब्दात सांगतो. |
| 13) योग्य शब्दात भावपूर्ण, कौटुंबिक प्रसंग उभे करतो. | 13) वर्णनात्मक, संवादात्मक काव्यात्मक भाषण करतो. |
| 14) कुटुंबात बोलताना शिष्टाचार पाळतो. | 14) अलंकारिक भाषेत बोलण्याचा प्रयत्न करतो. |
| 15) योग्य व स्पष्टपणे शब्दोच्चार करतो. | 15) कविताना स्वतःची चाल लावण्याचा प्रयत्न करतो. |
| 16) सुसंगत बोलतो. | 16) समुदायिक आणि वैयक्तिक चर्चेत सहभागी होतो. |
| 17) बोलताना भान ठेऊन बोलतो. | 17) साहित्यातील विविध प्रकार आणि असे प्रकार हाताळणारे ख्यातनाम साहित्यिक यांचे बाबत तुलनात्मक विचार भाषणातून मांडतो. |
| 18) न अडखळता, तोच तोच पणा टाळून बोलतो. | |
| 19) शब्दांचा उच्चार शुद्ध करतो. | |
| 20) संवादात सहभागी होतो. | |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - वाचन (Reading)** **विषय मराठी (प्रथम भाषा)**

## अध्ययनांश

| इयत्ता 9 | इयत्ता 10 |
|---|---|
| 1) प्रकट वाचन करताना देहबोलीचा वापर करतो. | 1) 5000 शब्दांचे ग्रहणात्मक वाचन करतो. |
| 2) योग्य आवाजात वेगाने वाचतो. | 2) मतितार्थ, विचारांची प्रतिमा साठवतो. |
| 3) अनुमानिक वाचन करतो. | 3) विराम चिन्हानुसार बोलताना सुस्वरात वाचतो. |
| 4) विश्लेषणात्मक वाचन करतो. | 4) विचार समजून घेऊन वाचतो. |
| 5) योग्य स्वराधात ठेवून योग्य ठिकाणी थांबतो. | 5) शब्दार्थ व भावार्थ समजून घेतो. |
| 6) वाचन करून विश्लेषण करतो. | 6) स्वतःचे अनुमान काढतो. |
| 7) आसक्तीने वाचतो. | 7) साहित्याचे परीक्षण करतो. |
| 8) प्रकटवाचन करतो. | 8) योग्य शीर्षक देतो. |
| 9) मौनवाचन करतो. | 9) अनुमानिक वाचन करतो. |
| 10) भावपूर्ण वाचन करतो. | 10) भावना समजून घेऊन वाचन करतो. |
| 11) गांभीर्यपूर्ण वाचन करतो. | 11) तात्विक भाव समजून घेतो, |
| 12) योग्य विराम व आघातासह वाचन करतो. | 12) मानवी मनाची गुंतागुंत समजून घेतो. |
| 13) कवी, लेखक किंवा त्या पात्रांच्या भावनेशी एकरूप होतो. | 13) विश्लेषण, टिपणी, तुलना फरक समजून घेतो. |
| 14) वाचन करताना निर्माण करावयाच्या गमती, त्याचा आस्वाद घेतो. | 14) अनेक गोष्टींचे संकलन करतो. |
| 15) प्रकट वाचनातून संदेश पोहचवितो. | 15) अत्याधुनिक साधनातून अधिक माहिती मिळवतो. |
| 16) वेगवान मौन वाचन करतो. | 16) परिच्छेदात्मक लिखाणाचे निरीक्षण करतो. |
| 17) शब्दार्थ व वाक्प्रचारांचा अर्थ समजून घेऊन वाचन करतो. | 17) सुसंगत कल्पनांचे ग्रहण करतो. |
| 18) वाचनातून मध्यवर्ती कल्पना मांडतो. | 18) शब्द कोष, संदर्भ ग्रंथ यांचा आधार घेतो. |
| 19) 1300 वाक्यांचे अपेक्षित वाचन. | 19) 'E-Learning' चा आधार घेतो. |
| 20) 150 ओळींचे काव्यवाचन. | 20) 1500 वाक्यांचे अपेक्षित वाचन करतो. |

# अध्ययन सामर्थ्य मानक सूची

**मानक - लेखन (Writing)**

**विषय मराठी (प्रथम भाषा)**

**अध्ययनांश**

| इयत्ता 9 | इयत्ता 10 |
|---|---|
| 1) श्रवण केलेल्या छोट्या कथा वाक्प्रचार व म्हणींचा वापर करून लिहितो. | 1) विषयाशी सुसंगत लिहितो. |
| 2) पाठ केलेल्या कविता लिहितो. | 2) तोच तोच पणा टाळतो. |
| 3) वाचलेला व श्रवण केलेला संवाद लिहितो. | 3) कवी, लेखक व स्वतःचे विचार नेमके मांडतो. |
| 4) छोट्या दोन ते तीन परिच्छेदांची माहिती व मोठ्या दोन पृष्ठांचे निबंध लिहितो. | 4) आकर्षक भाषेत शैलीदारपणे लिहिण्याचा प्रयत्न करतो. |
| 5) श्रवण केलेल्या किंवा वाचलेल्या भागावरील टिपणे स्वतः काढतो. | 5) स्वकाव्यरचना करतो. |
| 6) पृष्ठभर मजकूर संक्षिप्त करतो आणि विस्तारानेही लिहितो. | 6) परिच्छेदात्मक सुव्यवस्थित लिखाण करतो. |
| 7) वृत्तपत्रे, नियतकालिक यांच्याआधारे लेखन करण्याचा प्रयत्न करतो. | 7) विचारांचा प्रवाह आणि अभिव्यक्ती दिसून येते. |
| 8) विराम चिन्हांचा लेखनात वापर करतो. | 8) पत्रलेखन करतो. |
| 9) सुसंगत, सुवाच्च, सुंदर हस्ताक्षरात लिहितो. | 9) वर्णनात्मक, स्पष्टीकरणात्मक, विचारसमर्थन अनुमानिक शैलित करतो. |
| 10) संपर्कासाठी माहिती लिहितो. | 10) योग्य शब्दांचा वापर करतो. |
| 11) श्रुतलेखन करतो. सभेत किंवा वर्गात श्रवण करताना टिपणे घेतो. | 11) व्याकरणशुद्ध वाक्यरचना करतो. |
| 12) वाक्याचे विविध प्रकार लेखनात हाताळतो. | 12) विचार व कल्पनांचे तांत्रिक संयोजन करतो. |
| 13) संकल्पना सुसंगतपणे मांडतो. | 13) वाक्यप्रचार, म्हणी, लोकोक्ती, सुभाषिते, अलंकारिकता यांचा वापर करतो. |
| 14) प्रसंग, विषय, कल्पना यांची सांगड घालून लिहितो. | 14) लेखनात साहित्याच्या प्रकारांचा उल्लेख करतो. |
| 15) लेखनाचा प्रारंभ आकर्षक करून कल्पनाविस्तार आणि समारोप योग्य प्रकारे करतो. | 15) साहित्याचे वर्गीकरण करतो. |
| 16) संवाद किंवा नाट्यप्रवेशात भूमिका करतो. | 16) अभिव्यक्ती दिसून येते. |
| 17) कथेचे नाट्यरुपांतर करतो. | 17) स्वलेखनातून संपर्क वाढतो. |
| 18) सुभाषितांचा संग्रह करतो. | 18) दुःख, विनोद, सहानुभूती इ. भावना व्यक्त करतो. |